येणेप्रमाणे चतुःसिमेतील मिळकत सामाईक सुखसुविधा, सामाईक जिना, सामाईक टेरेस गार्डनसह तसेच जाण्यायेण्याचे सामाईक वाग वाहिवाटीचे सर्व हक्कासह दरोबस्त मिळकत.

ब. हस्तांतरित करीत असलेल्या सदनिकेचे वर्णन:- वर कलम १अ मध्ये वर्णन केलेल्या प्लॉट मिळकतीवर बांधण्यात आलेल्या **श्री शाम रो हाउसेस** या नांवाने ओळखल्या जाणाऱ्या रो-हाउस मधील **रो-हाउस क्रमांक १** यासी बांधीव क्षेत्र ३९४.२४ फुट. यासी चटई क्षेत्र ११२६.४२ चौ. फुट. यासी चतुः सिमा पुढीलप्रमाणे-

| | |
|---|---|
| पूर्वेस | : रोड |
| पश्चीमेस | : रो-हाउस क्रमांक ४ |
| दक्षिणेस | : रोड |
| उत्तरेस | : रो-हाउस क्रमांक ५/२ |

(२) मिळकतीचा पुर्वेतिहासः वर कलम १ मध्ये वर्णन केलेली मिळकत ही लिहून देणार यांच्या स्वकष्टार्जित खरेदी मालकीची व कबजे वहिवाटीतील अशी असुन उपरोक्त कलम १ मधील मिळकत लिहून देणार यांनी सदरचा दस्त अनूक्रमांक ०४२६२/२००९ विजय बरसू वराडे यांचेकडून कायम फरोक्त खरेदीखत दस्ताअन्वये विकत घेतलेली आहे. मे. दुय्यम निबंधक साहेब-३ नाशिक यांचे कार्यालयात दि. ०९/०७/२००९ रोजी नोंदविलेला आहे.

(३) मिळकतीची किंमत: वर कलम १ मध्ये वर्णन केलेली मिळकत लिहून देणार यांनी विक्री करण्याचे ठरवले. सदर बाब लिहून घेणार यांना समजल्यानंतर सदर मिळकत विकत घेणेसाठी लिहून घेणार यांनी लिहून देणार यांचेकडे मागणी केली त्यानुसार मिळकतीबाबत व्यवहारची बोलणी करण्यात आली व लिहून देणार यांनी लिहून घेणार यांची मागणी मान्य केली. सदर व्यवहाराची बोलणी यशस्वी होऊन उभयतांमध्ये आजचे प्रचलित बाजार भावानुसार मिळकतीचा मोबदला रक्कम रु. ३०,००,०००/- (अक्षरी रक्कम रुपये तीस लाख मात्र) कायम करण्यात आला. सदरची किंमत ही आजच्या बाजारभावाप्रमाणे योग्य व बरोबर आहे. लिहून देणार हे ठरलेला मोबदल्या अनुसार रक्कम रु. ३०,००,०००/- (अक्षरी रक्कम रुपये तीस लाख मात्र) इतका मिळकतीचा मोबदला स्वीकारून लिहून घेणार यांचे लाभात कलम १ब मध्ये नमूद मिळकत कोणत्याही अटी शिवाय कायदा आणि संपूर्ण तरतुदींना अधीन राहून मालकी हक्क आणि कब्जा हक्क तसेच त्यापोटी लिहून देणार यांना असलेल्या वागवहिवाटीच्या हकांसह कायमस्वरूपी लिहून घेणार यांचे नावे करण्याचे कायमफारोक्त खरेदीखत लिहून व नोंदवून देत आहे. भरणा तपशील कलम ८ मध्ये नमूद केलेला आहे.

(४) कर व टॅक्सेसचा भरणा वर कलम १ मध्ये वर्णन केलेल्या मिळकतीची नाशिक महानगरपालिका यांची घरपट्टी, पाणीपट्टी, महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी लि. यांचे वीज बिल ताबा देईपावेतो संपुर्ण रक्कम लिहून देणार यांनी भरलेली आहे. सामाईक बिनशेतीकर, अपार्टमेंट मेंटेनन्स